# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ )

*(आस्थापना विभाग)*


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२


क्र./आस्था/133/२०१५ दि. : २१/०७/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय:— शासकीय व निमशासकिय कार्यालयातील अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी शीघ्र कार्यवाही होण्यासाठी विशेष प्राधान्य देणेबाबत.

संदर्भ :— १शासन पत्र क्रं.संकिर्ण—२०१५/प्र.क्र ९६—२०१५/आस्था—२, दि. २२/६/२०१५.
२.शासप परिपत्रक क्र.अपंग—२०१५/प्रक्रं.७५/अक.२, दि. २० एप्रिल २०१५.
३.संचालनालयाचे पत्र क्रं.उशिसं/२०१५/अपंग/मवि—१/६८७८, दि. ०६/७/२०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र ३ नुसार उच्च शिक्षण संचालणालय,पूणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर माहिती **www.unigug.org** या संकेत स्थळावर देण्यात आले आहे. सदर शासन परिपत्रक नमुद केलेल्या मुदयानुसार त्यावर योग्य कार्यवाही घेण्यात यावी. तसेच संबधित कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास तात्काळ सादर करण्यात यावा.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र:—
३. उच्च शिक्षण संचालणालयाचे पत्र
४. शासन परिपत्रक

E/ vijaya/Handicap Letter/ 01

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


पत्र क्र.उशिसं/२०१५/अपंग/मवि-१ 16878 दिनांक- ०६/०७/२०१५

**परिपत्रक**

प्रति,

१) कुलसचिव,
अकृषी विद्यापीठे (सर्व).

२) विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

**विषय :- शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी शीघ्र कार्यवाही होण्यासाठी विशेष प्राधान्य देणेबाबत.**

**संदर्भ :-** १. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ९६-२०१५ / आस्था-२, दि.२२ जून २०१५
२. शासन परिपत्रक क्र.अपंग-२०१५/प्र.क्र.७५ /अ.क.२, दि.२० एप्रिल २०१५

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन करावे. (प्रत संलग्न) सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

राज्यातील निरनिराळया शासकीय / निमशासकीय कार्यालयात कामाच्या निमित्ताने विविध नागरिकांच्या बरोबरच अपंग नागरिकही येत असतात. अपंग नागरिकांना कामासाठी निष्कारण ताटकळत बसावे लागू नये तसेच त्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागू नये म्हणून शासनाने खालील मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

१. अपंग नागरिकांना कार्यालयात अर्ज / कागदपत्रे देण्यास / घेण्यास प्राधान्य द्यावे.
२. अपंगांना अर्ज / कागदपत्रे भरणे शक्य नसल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी सर्वतोपरी सहकार्य करावे.
३. अपंगांना कामासाठी निष्कारण ताटकळत बसावे लागणार नाही तसेच वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी नियम अटींच्या अधीन राहून शीघ्र कार्यवाही होण्यासाठी विभागांनी प्राधान्य द्यावे.

उपरोक्त नमूद मुद्यांबाबत आपल्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये / महाविद्यालयांना सदर परिपत्रक उपलब्ध करून द्यावे. तसेच उचित कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

( **डॉ. व्ही.आर.मोरे** )
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- १. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२. सर्व कर्मचारी - प्रस्तुत कार्यालय (शाखा प्रमुखांमार्फत)
३. निवड नस्ती.

शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी शिघ्र कार्यवाही होण्यासाठी विशेष प्राधान्य देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक :-अपंग -२०१५/प्र.क्र.७५ / अ.क.२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- २० एप्रिल, २०१५

वाचा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :-संकीर्ण -२०१४/प्र.क्र.७७/१८ दिनांक :- ०४ डिसेंबर, २०१४

**शासन परिपत्रक:-**

राज्यातील निरनिराळ्या शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात नागरिक त्यांच्या कामाच्या निमित्ताने येत असतात. त्यात अपंगांचा देखील समावेश आहे. राज्यातील अपंग नागरिकांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात त्यांच्या कामासाठी निष्कारण ताटकळत बसावे लागू नये तसेच त्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागू नये म्हणून खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

१. कार्यालयात अपंग नागरिकांना अर्ज /कागदपत्र घेण्यास /देण्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

२. अपंग नागरिकांना अर्ज /कागदपत्रे भरणे शक्य नसल्यास अधिकारी /कर्मचारी यांनी सर्वतोपरी सहकार्य करावे.

३. अपंगांना कामासाठी निष्कारण ताटकळत बसावे लागणार नाही तसेच त्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

४) अपंग नागरिकांच्या समस्या प्रकरणी नियमातील अटी व शर्तींच्या अधीन राहून शिघ्र कार्यवाही होण्यासाठी विभागांनी प्राधान्य द्यावे.

२. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१५०४०८१७२२०४६६२२ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( उज्ज्वल उके )

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

२) सर्व विधानमंडळ / संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,